Review Of Research
Vol. 3 | Issue. 9 | June. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# अवयव दान – काळाची गरज

**डॉ. उज्ज्वला दा. लोणकर**
**प्राचार्य , शारदाबाई पवार महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शारदानगर.तालुका: बारामती. जिल्हा : पुणे.**

**प्रस्तावना :**

अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. मरावे परि किर्तीरूपी उरावे अशी मराठीत म्हण आहे. मरणोत्तर अवयवदानामुळे अन्य कोणीतरी हे सुंदर जग पाहू शकेल. योग्यप्रमाणात अवयवदान होत नसल्याने आजही कित्येकजण हे विविध अवयवाक्ष प्रतिक्षेत आहेत.श्रीलंकेत मानवी अवयव हि राष्ट्रीय संपत्ती म्हणून ग्राहय धरली आहे.अवयवदानासाठी इच्छा महत्वाची असते. अवयवदान हा मानव नावाच्या प्राण्याच्या सुपीक डोक्यातून बाहेर पडलेला नवा आविष्कार आहे.या आविष्कारामुळे परावलंबी माणूस स्वावलंबी आयुष्य जगु शकतो. मरणोत्तर मानवी अवयवाची एक तर राख होते किंवा माती होते.

मरणोत्तर नेत्रदान,त्वचादान किंवा अवयवदान केल्यामुळे जर अन्य कोणा गरजुला जीवनाची अनुभूती घेता येऊ शकेल मर त्यापेक्षा कोणते श्रेष्ठ दान असूच शकत नाही. कुटुंब प्रमुखाच्या सुज्ञ व प्रभावी प्रबोधनातून अन्य सर्वच सदस्यांना अवयवदानासाठी निश्‍चितच प्रवृत्त करता येऊ शकते.

ध्यानं परं कृतयुगे त्रेतयां ज्ञानमुच्यते
द्वापरे यज्ञमेवाहू: दानमेव कलौयुगे

कृत युगात ध्यान, त्रेता युगात ज्ञान, द्वापार युगात यज्ञ आणि कलीयुगात दान हे साधन असल्याचा उल्लेख कर्म पुराणात आढळतो. कलयुगात दानाला महत्व होते. त्यामुळे भुदान,गोदान,संपत्तीचे दान,अन्नदान,वस्त्रदान याप्रकारचे दान केल्याचा उल्लेख आढळतो. पौराणीक कथांमध्ये दधिची ऋषींनी वृत्तसुराला मारण्यासाठी आपल्या अस्थींचे इंद्राला दान दिले होते, शिबी राजाने कबुतराचे प्राण वाचविण्यासाठी आपल्या अंगावरचे मांस दान दिले तर कर्णाने जन्मत:च शरीराचा एक भाग म्हणून लाभलेले कवच कुंडल दान केले.यावरून लक्षात येते की, भारतीय संस्कृतीत पुराणकाळापासून अवयवदानाची संकल्पना रूढ आहे.

जागतिक पातळीवर १३ ऑगस्ट हा जागतिक अवयव दिन म्हणून साजरा केला जातो. अवयवदानाची सुरूवात अमेरिकेतील बोस्टनमध्ये किडनी प्रत्यारोपनं झाली. या शस्त्रक्रियेत एका

जुळया भावाची किडनी त्याच्या आयडेंटिकल जुळया भावाला बसविण्यात आली.त्याआधीही नेत्रदान,त्वचादान सुरू होते, पण किडनी प्रत्यारोपन हे एक मोठं पाऊल होतं.

**अवयव दान म्हणजे :**

▪ जिवंतपणी अथवा मृत झाल्यावर आपले अवयव दुस—या व्यक्तीला देणे.

▪ एखाद्या जिवंत किंवा मृत मानवी शरीरातील अवयव वा टिशूज त्या शरीरातून काढुन दुस—या मानवी श्शरीरात त्याचे प्रत्यारोपण करणे म्हणजे अवयव दान. हे दान करताना त्या उत्तरदायित्वाची सम्मती घेतली जाते.

अवयव दान सर्वश्रेष्ठ दान असून ज्याद्वारे आपण मृत्यंनंतर आपले अवयव दान करून अंतिम स्वरूपी ज्यांचे अअवयव निका मी झाले आहे. अशा अनेक रूग्नांचे प्राण वाचवू शकतो.

अवयव प्रत्यारोपण किंवा प्रतिरोपण : मानवी अवयव प्रत्यारोपण म्हणजे आधुनिक वैद्यकीय शास्त्राची वक मोठी भेट आहे.यात एखाद्याजिवंत किंवा मृत व्यक्तीचा अवयव किंवा मानवी अवयवाचा काही भाग शस्त्रक्रियेद्वारा वेगळा करून तो गरजवंताला रूग्नालयामध्ये प्रत्यारोपित करतात. ज्यांचा एखादा अवयव कायमस्वरूपी निकामी झाला आहे. अशा रूग्नांसाठी ही प्रमाणित व उपलब्ध उपचार पध्दती आहे.

व्यक्ती त्याच्या आर्थिक,सामाजिक पातळीच्या पलिकडे जाऊन मानव म्हणून अनेक देणग्या देऊ. शकते. त्यापैकी अवयवदान हे एक दान आहे. त्यामुळे अवयवदान हे सर्व श्रेष्ठ दान आहे.

स्वरूप :

▪ अवयव दान डोळे किंवा किडनी पुरते मर्यादित नसून शरिराचे विविध भाग दान करू शकतो. पण त्यासाठी जबरदस्त इच्छा, पुरेशी माहिती व दुस—याप्रती संवेदनयिालता असली पाहिजे. मृत्युनंतर नेत्र, मेंदू,ह्दय,त्वचा अशा विविध अवयवांचे दान करून एक व्क्ती दोन—तीन व्यक्तिंच्या रूपाने जिवंत राहू शकते. श्रीलंकेसारखा छोटा देश नेत्र निर्यातीत जगात पहिल्या स्थानावर आहे.अनेक देशात मृत व्यक्तीने मरण्याआधी आपले अवयवदान करू नये,असे स्पष्ट जाहिर केले असेल तरच त्या व्यक्तीचे अवयवदान केले जात नाही.अन्यथा प्रत्येक व्यक्तिची अवयवदानाला मान्यता आहे.असे मानून त्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात येते. अवयवदानासंबंधीचा कायदा १९९४ साली झाला असला तरी त्यातील तरदुदींविषयी जनमानसात फारशी माहिती नाही,त्यामुळे आपल्याकडे अवयवदानाचे प्रमाण कमी आहे.

▪ Transplantation of Human Organs Act (THOA),1994 या ॲक्टद्वसरे अवयवदान आणि ब्रेनडेड या संकल्पना स्विकारल्या गेल्या. मात्र अवयव खरेदी—विक्रीवर कायद्याने बंदी आहे. म्हणजे या व्यवहारात पैशाची देवाणघेवाण कायदेशीर नाही.

**पुढील अवयव दान करता येतात :**

ह्दय, यकृत, मूत्रपिंड यासारखे अवयव तसेच त्वचा, कॉर्निया, बोन मॅरो यासारख्या टीशूज दान करता येतात. यातील काही जिवंतपणी तर काही मरणोत्तर दान करता येतात.

जिवंत असताना आपण आरोग्याला सांभाळून किडनी,रक्त,बोनमॅरो,बोन्स,त्वचा,ब्ड सेल्स आणि काही अवयवयांचा (यकृत, फुफ्फुस आणि दुर्मिळ केसेस मध्ये स्वादुपिंड आणि आतडी) काही भाग दान करता येतो.तर मरणोत्तर अवयवदानात वर उल्लेख केल्या व्यतिरिक्त पुढील अवयव आणि टीशूज दान करू शकतो. फुफ्फुस, आतडी, स्वादुपिंड, हृदयातील व्हॉल्व्हज, हृदय,रक्तवाहिन्या असे एकूण ३४ अवयव व टिशूज दान करता येतात.

**अवयवदानाचे प्रकार :**

जागतिक पातळीवर अवयवदानाकरीता स्वसंमतीच्या ऑप्ट—इन पध्दती व ऑप्ट—आऊट पध्दती या वापरल्या जातात.

१.जिवंत पणी करता येणारे अवयवदान (ऑप्ट—इन पध्दत) : या पध्दतीत ज्या दात्यांनी खास फॉर्म भरून आपली सम्मती जाहीर केली असेल अशांनाच दाते समजण्यात येते.भारतात 'आप्ट—इन' ही पध्दत वापरली जाते.जिवंतपणी अवयवदान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रत्यारोपण समन्वय केंद्र या अधिकृत संस्थेची मान्यता असते. अवयवदानानंतर दात्याच्या प्रकुतीवर दुष्परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट झाल्यानंरच ही परवानगी दिली जाते. त्यामुळे जिवंतपणी किडणी व यकृताचे काही प्रमाणत दान करता येते. तसेच रक्त हे देखील मानवी शरीराचा अविभाज्य भाग आहे. मानवी श्शरीराचे संतुलन राखण्यासाठी रक्ताची निर्मिती होत असते. त्यामुळे ठराविक कालावधीमध्ये रक्तदान करणे हे आरोग्यासाठी चांगले असते.

२.मरणोत्तर करण्यात येणरे अवयवदान (ऑप्ट—आऊट पध्दत) : या पध्दतीत 'अवयवदान करायचे नाही' असा नकार नसलेल्या उर्वरीत सगळयांना ते दाते आहेत असं गृहीत धरलं आते. ऑप्ट—आऊट पध्दतीचा स्विकार केल्यास दात्यांची संख्या लक्षणीयरित्या वाढू शकते. जर्मनीमध्ये ही पध्दती आहे.हृदय बंद पडून होणारा मृत्यु जसे वृध्दापकाळाने किंवा नैसर्गिक मृत्युनंतर फक्त नेत्रदान, त्वचादान, हृदयाच्या झडपा दान करू शकतो. मेंदू बंद पडून होणरा मृत्यु म्हणजे ज्याला ब्रेन डेथा म्हणता. यामध्ये मेंदूला इजा झाल्याने माणसाचा मृत्यु होतो. यात माणसाचा फक्त मेंदू मृत पावलेला असतो पण हृदय,यकृत,मुत्रपिंड,फुफ्फुस हे अवयव चालु स्थितीत असल्याने त्यांचे दान करता येते

▪ किती तासात अवयव प्रत्यारोपण करणे शक्य आहे. ?

डोळे : काही महिने.

त्वचा : सहा तासांच्या आत.

फुफ्फस : सहा तासांच्या आत.

किडनी : ४८ तासांच्या आत.

किमान ३ वर्षे व त्याहून अधिक कोणीही व्यक्ती अवयवदान करू शकते.

लाईफ सपोर्ट सिस्टीमवरील ब्रेनडेड रूग्णांच्या नातेवाईकांनी मंजुरी दिल्यास, त्यांचे अवयवदान होऊ शकते.

नैसर्गिक मृत्यु झाला असल्यास त्या व्यक्तीचे अवयवदान करता येऊ शकते.

आज अवयवदानाविषयी सर्वस्तरावर जनजागृती करणे आवश्यक आहे.अवयव दान व देह दान या दोन्हीमध्ये फरक आहे. अवयव दान हे जिवंतपणी व मरणानंतर ही केले जाते. मृत्युपश्चात करण्यात येणा—या अवयवदानानंतर मृत शरीर हे नातेवाईकांच्या ताब्यात देताना ते व्यवस्थित प्रक्रिया करून दिले जाते.अवयवदान करताना ठराविक भागाचे अवयवदान केले जाते. देहदान करताना फक्त मरणानंतरच एखाद्या वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टरांना मानवी शरीराचा अभ्यास,प्रत्यक्षिक व संशोधन करण्यासाठी दिले जाते.देहदानानंतर असे मृत शरीर धार्मिक विधी

Review Of Research
Vol. 3 | Issue. 9 | June. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

करण्यासाठी नातेवाईकांकडे दिले जात नाही तर ते फक्त संशोधनासाठीच वापरले जाते. अवयवदान करणा—या व्यक्तींपेक्षा गरजू व्यक्तींची संख्या अधिक आहे. अवयवदानात प्रत्येकाने सहभाग नोंदविला पाहिजे.वैद्यकीय शोधतील प्रगतीने अवयवदान करण्याची प्रक्रिया काही प्रमाणत सोपी झाली आहे.मानवी शरीर हे क्षणभंगूर आहे. मृत्युनंतर सर्व काही नष्ट होते.पण अवयवरूपी लिवंत रहायचे असेल तर अवयवदान केले पाहिजे. मृत्युनंतर एक देह सात जणांच्या आयुष्यात एक आशेचा किरण ठरू शकतो तर ३५ लोकांच्या आयुष्याचा दर्जा सुधारू शकतो. आज समाजात अवयवदानाविषयी पाहिजे तेवढी जाणिव जागृती झाली नाही. त्यामुळे कित्येक रूग्ण अनेक वर्षे प्रतिक्षेत आहेत.२. नेत्रदान किंवा त्वचादान करध्याची इच्छा असल्यास व नातवाईकांनी संमती दिल्यास नेत्र व त्वचा जमा करून घेतल्यावर नातेवाईकांच्या भवना दुखावल्या जाणार नाहीत अशा प्रकारे व्यवस्थित मृतदेह नातेवाईकांकडे दिला जातो. त्वचादानाविषयी एक गैरसमज आो की, आपल्यानंतर मृतदेह बघणे शक्य होणार नाही. परंतु त्वचादान म्हणजे संपूर्ण मृतदेहाची त्वचा न काढता फक्त पोट व मांडी येथीलच त्वचा जमा केली जाते.भाजलेल्या व्यक्तीला त्वचा मिळाल्यास त्याच्या जखमा लवकर भरून येण्यास मदत होते. त्याचप्रमाणे अशी व्यक्ती बरी झाल्यावरही भाजल्याच्या व्रणांमुळे येणा—या विद्रुपतेपासमन वाचू शकते.

**उपक्रम :**

१. जनजागृती व लोकप्रबोधन : महाराष्ट्राच्या भूमीत संतपरंपरा, शाहिरी परंपरा, लोककलांच्या माध्यमातून सतत लोकजागृती व जनजागृतीचा जागर घडवून आणला जातो. या परंपरेनुसार विविध लोककलांच्या माध्यमातून अवयवदानाविष्यी जनजागृती करता येते. अभंग,पोवाडा,भारूड,लावणी, आरती,भजन वगैरे माध्यमातून अवयवदान चळवळ लोकांपर्यंत पाहचविता येईल.

१. स्वयंसेवी सेस्थंची स्थापना : एखाद्या दुदैवी व्यक्तींच्या अपंगत्वाचे निवारण करण्यासाठी मदतनीस व्यक्तींची फळी तयार करण्यासाठी सरकारने स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. अवयवदानाविषयी जागृत करण्यासाठी ठिकठिकाणी भित्तीपत्रके, जाहिराती या मधध्यमातून जनमानसाला त्साचे महत्व पटवून द्यावे.अवयवदानाचे महत्व सांगणारे देशव्यापी कार्यक्रम आखवेत.प्रत्येक

२. प्रत्येक तालुक्यात, अथवा गावात सरकारी रूग्नालयात अवदानाविष्यी माहिती देणारा स्वतंत्रकक्ष असावा.

३. अवयवदानाविषयी घराघरात माहिती पोहचविली पाहिजे :अवयवदानाच्या माध्यमातून मृत्युनंतरही जिवंत राहता येते. हे काम पुण्या कमवायचे आहे. सर्व इंद्रिये आपल्याला भगवंताने दिली आहेत.तुकोबांच्या भाषेत सांगायचे झाले तर दिली इंद्रिये पाय कान। डोळे मुख बोलाया वचन।। या शब्दात तुकोबांनी शरीराची महती सांगितली आहे.विज्ञानाच्या प्रगतीमुळे आपण या इंद्रियांचा पुन्हा वापर करू शकतो.

४. जाहीराती : गावागावातून, शहरातून फलकावरती अवयवदानाची माहिती देणारे फलक लावले पाहिजेत.दवाखाने,सरकसरी आरोग्य केंद्रे येथेही फलक लावावेत. त्यामुळे अवयवदानाची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचेल व कित्येक माणसे सहकार्य करतील. जी माणसे या दानात सहभागी होतील त्यांना विशिष्ट निशाणी दिली पाहिजे. गरजू माणसे यानिमित्ताने पटकन कळतील व गरजूंना मदत करणारी इच्छुक माणसे ही यानिमित्ताने पुढे येतील.

५. चर्चासत्र– सेमिनार यांचे आयोजन : भारतात असलेल्या धार्मिक चालीरिती आणि त्याचा जनमाणसावर असलेला प्रचंड पगडा यामंळे अवयवदान करण्याची मानसिकता दिसून येत नाही. प्रत्येक श्शाळेत, महाविद्यालयातकेपनीत तसेच प्रत्येक गल्ली,वाडी वस्ती येथे संस्थेमार्फत अवयव प्रत्यारोपणाबाबत माहिती देणारे चर्चासत्र , सेमिनार आयेजित करावेत.
६. अवयवदात्यांच्या कुटुंबाचा सत्कार : आपल्या मृत्युत्नंतरही आपले हे श्शरीर आणि श्शरीराचे अवयव दुस–या व्यक्तीसाठी उपयोगी पडले तर त्यासारखे अन्य पूण्य नाही.आज अवयवदात्यांची संख्या कमी आहे. कराण अजूनही अनेकांच्या मनात अवयवदानाविषयी गैरसमज आहेत. अवयवदात्यांच्या कुटुंबाचा सत्कार केल्यास अवयवदानाचा प्रसार होईल.
७. अभ्याक्रमामध्ये माहिती : नेत्रदानाविषयी, रक्तदानाविषयी महिती असते.मात्र आता अवयवदानाविषयीची माहिती वाढवावी.
८. जनजागृती : असाध्य आजाराने,अपघाताने किवा अन्य कारणाने माणसाच्या शरीरात निकामी झालेले हृदय, मोठे अवयव किंवा त्वचा यांचे प्रत्यारोपण करून संबंधितांना नव्याने जीवन जगण्याची संधी देणा–या या तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती घडवून आणलेली आहे. प्रत्यारोपण कार्यात देहदान,अवयवदान,त्वचादान याची नितांत गरज आहे. अवयवदानाबाबचे गैरसमज, अंधश्रध्दा यात अडकलेल्या भारतीयांमध्ये अवयवदानाची इच्छा आहे पण त्याबाबत योग्य मार्गदर्शन देणारे कोणी नसल्याने हा विचार केवळ विचारापुरताच मर्यादित आहे.परिणामी अवयवदान माहिमेत लोकांचा फारसा प्रतिसाद मिळत नाही. आपल्या प्रिय व्यक्तीच्या निधनानंतरही त्या व्यक्तीचा समाजाला उपयोग होऊ श्शकतो. ही धारणा समाजमनात रूजवायला हवी.
९. तुम्ही जगा नी दुस–यालाही जगवा हा महान संदेश समाजाला द्यावा.
१०.सार्वजनिक समारंभातून जनजागृती करावी. : अवयवदानाबाबत जागृती करण्यासाठी सार्वजनिक कार्यक्रमासारखे दुसरे व्यासपीठ नाही.गणपतीसीरख्या उत्सवाच्या माध्यमातून त्वचादान,नेत्रदान यासाठी अर्ज भरून घ्यावेत.
११.अवयवदानासाठी माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना टोल फ्रि हेल्पलाइन उपलब्ध करून देऊन मदतकक्ष स्थापन करण्यात यावेत.
१२.घरोघरी जाऊन ज्या पध्दतीने वस्तूंचे मार्केटिंग केले जाते त्सा धर्तीवर अवयवदान जागृती मोहीम साकारण्यात यावी.किडनी,त्वचा,नेत्र व यकृतदानाने अनेकांचे प्राण वाचू शकतील.
१३.साहित्य पथनाटये इ.द्वारा जनजागृती करावी.
१४.ब्रॅड ॲम्बेसेडर नेमावेत : मरणोत्तोर अवयवदानाच्या प्रसारासाठी सरकारने बॉलिवुड संलिब्रेटिजना ब्रॅड ॲम्बेसेडर म्हणून घोषित करावे. माजी मिस वर्ल्ड ऐश्वर्या रायनेही कारकिर्दीच्या सुरूवातीलाच अवयवदानाविषयी जाहिरत केली होती.
१५.अवयवदान शिबीरांचे आयोजन :आज जसे रक्तदान शिबिरांचे कार्यक्रम सामाजिक संस्था आयोजित करतात,तसे कार्यक्रम अवयवदानाचे व्हायला हवेत.अवयवदानाची मोहीम समाजातील तळागळापर्यंत पोहसेचायला हवी.
१६.चित्रपट निर्मिती : हिंदी,मराठी चित्रपट,नाटक यांची निर्मिती करून अवयवदानाचे महत्व समाजाला पटवून द्यावे.
१७.गावातील महिला बचत गट मोठया प्रमाणत कार्यरत आहेत.त्याच्या माध्यमातेनही अवयवदानाचे महत्व पअवून दिले पाहिजे.

Review Of Research
Vol. 3 | Issue. 9 | June. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

**समारोप :**

भारतासारख्या मोठया लोकसंख्येच्या देशात असे अवयव, नेत्र,त्वचा आणि संपूर्ण देह यांची खरं तर खुप मोठी गरज आहे. परंतु अनेक गैरसमज, रूग्नालयांची उदासिनता यामुळे ही गरज काही टक्के पूर्ण होऊ शकत नाही. मृत व्यक्तीविषयी नातेवाईकांच्या मनात आदर असतो. तो आदर अशााप्रकारे द्विगुणित करू शकतो अशी मानसिकता नातेवाईकांची व्हायला पाहीजे. भारतासारख्या देशात अवयवदानाची खुप मोठी गरज आहे.मरावे परी अवयवरूपी उरावे या नव्या संकल्पनेनुसार कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने अवयवदानाचा संकल्प केला पाहिजे.

**REFERENCES :**

https://notto.gov.in
https://www.thebetterindia.com
https://www.mohanfoundation.org
https://www.loksatta.com